# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/ईमेल/२०२० दिनांक:- १२ जानेवारी, २०२०

जळगांव दि.१२ ( ):- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात आयोजित त्रिवेणी शिखर परिषदेच्या दुसऱ्या दिवशी अभियांत्रिकी, विना अभियांत्रीकी, कृषी, ऊर्जा, बांधकाम, क्लस्टर आदी क्षेत्रातील व्यवसाय वाढीसमोरील आव्हाने आणि संधी यावर दिग्गज व्यावसायिकांनी मंथन करुन या आव्हानांचे संधीत रुपांतर करण्याचा हा काळ असल्याचे सांगत खान्देशातील व्यवसाय वाढीच्या टिप्प्स दिल्या.

रविवारी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात मोठ्या उत्साहाने या परिषदेच्या विविध सत्रांना प्रारंभ झाला. वाहन उद्योगातील आव्हाने आणि संधी या विषयी टाटा मोटर्स लि.चे उपमहाव्यवस्थापक उदयन पाठक यांनी माहीती दिली. प्रदुषणाला आळा घालणारी वाहने तयार करावी लागत आहेत. वाहतुकीच्या साधणांमुळे अमुलाग्र बदल झाला असून वाहन उद्योगाने आपली गरज सिध्द केली आहे. नवनवीन तंत्रज्ञान मोटारींच्या वापरात येऊ लागल्या आहेत. गोपीनाथ मुंडे यांच्या अपघाती निधनानंतर वाहनांमध्ये सुरक्षेला अधिक प्राधान्य देण्याबाबत काळजी घेतली जाऊ लागली आहे. पर्यायी इंधनाच्या दृष्टीने विद्युत किंवा इलेक्ट्रीक वाहन धोरणाची अमंलबजावणी केली जात आहे. स्पेक्ट्रम इंडस्ट्रिजचे संचालक नरेंद्र वाघ यांनी घरगुती वापराच्या वस्तुंमधील नवीन तंत्रज्ञान, त्याचे परिणाम या विषयी माहिती देतांना उत्पादनाचे हे युग आयओटीने प्रभावित झाले आहेत असे सांगितले. के.पी.आय.टी. टेक्नॉलॉजीचे उपाध्यक्ष अतुल तारे यांनी देखील नव्या बदलांची माहिती दिली.

सुप्रीम इंडस्ट्रीजचे वरिष्ठ व्यवस्थापक संजय प्रभुदेसाई, गुजराथ पेंटचे संचालक हमीद मेमन, एसके फार्म्युलेशनचे सचिन जोशी यांनी अभियांत्रीकी नसलेल्या उद्योगातील बदल आणि आव्हाने या विषयीची मांडणी केली. ई.ई.पी.सी., मुंबईचे विभागीय संचालक रजत श्रीवास्तव आणि सहाय्यक संचालक वरुण चुलाटे यांनी निर्यात क्षेत्रातील संधींविषयी सविस्तर माहिती दिली. खान्देशातील कृषी क्षेत्र लक्षात घेऊन साठवणूक गृह आणि अन्न प्रक्रिया या विषयी मांडणी करतांना खान्देशात असलेल्या केळीवर विविध प्रकारची प्रक्रिया करुन उत्पादन करता येऊ शकते. याशिवाय स्थानिक पिकांचे महत्व लक्षात घेऊन त्यावरही अन्न प्रक्रिया केली जावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या सत्रात लातुरचे हेमंत वैद्य, अग्रीकल्चर स्किल कौन्सीलचे मुख्य कार्यकारी डॉ. सतेंद्र सिंग, धुळे येथील अल्केश अग्रवाल, दिल्ली येथील सुनील मारवाह आणि मुंबई येथील अशोक शहाणे यांनी या विषयावर भाष्य केले. अपारंपारिक ऊर्जा विषयी संदीप गुप्ते यांनी तर प्रा.आर.एल. शिंदे यांनी उद्योग क्षेत्रातील सांख्यिकीयचे महत्व यावर मांडणी केली. तसेच बांधकाम क्षेत्राविषयी बीटा कन्स्ट्रक्शनचे भरत अमळकर, श्री. जकातदार, आश्विन अग्रवाल यांनी व क्लस्टर विषयी बंकीम मिस्त्री आणि माहितीतंत्रज्ञानाविषयी अविनाश चाटे, तस्नील वासोवाला, नितीन मकासरे यांनी माहिती दिली. दुरदर्शन, दुरचित्रवाहिन्या आणि जाहिरात क्षेत्र यातील संधींविषयी सुप्रसिध्द अभिनेते संदीप कुलकर्णी, विनित बनसोडे आणि देवेंद्र बाळसराफ यांनी सविस्तर माहिती दिली.

वाहन असो की कृषी अथवा बांधकाम या सर्व क्षेत्रांमध्ये नवे बदल अपरिहार्य असून या बदलांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल त्यातून व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न करावे लागतील. खान्देशात या सर्वच क्षेत्रातील व्यवसाय वाढीसाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याचा सुर या विविध सत्रांमधून व्यक्त झाला. यावेळी पितांबरीच्या आयओकेईएन या ॲन्टीव्हायरस सॉफ्टवेअरचे लाँचिंग अशोक दुगाडे व प्रा.भुषण चौधरी यांच्या उपस्थितीत झाले. या दोन दिवशीय परिषदेत ९० विद्यार्थी आणि ७० उद्योजक सहभागी झाले.

**विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणार**

सेक्टर इंडिया अंतर्गत नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे व एल ॲण्ड टीचे अशोक शहाणे, ॲग्रीकल्चर स्कील कॉन्सील ऑफ इंडियाचे सत्येंद्र सिंग आर्य, फुड इन्डस्ट्रीज कॅपासिटी बिल्डींग ॲण्ड स्कील इनिसिटीव्हचे सुनील मारवा आणि सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे छबीलदास राणे आदी सोबत प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.रत्नमाला बेंद्रे, प्लेसमेंट सेलचे संचालक प्रा. भुषण चौधरी यांनी विद्यापीठात स्कील कोर्सेस

(अॅडव्हाक / इलेक्टीव्ह् कोर्स अंतर्गत) विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत सखोल चर्चा झाली. या करिता विद्यापीठातील प्लेसमेंट कक्षामार्फत स्कील कौन्सींल बरोबर प्रारुप तयार करुन विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना औद्योगिक व शेती क्षेत्रासाठी अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/ईमेल/२०२० दिनांक १२ जानेवारी, २०२०

प्रति,
मा.संपादक,/प्रतिनिधी,

कृपया, वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दीस देऊन सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.१२ (                ) भाषेचे ओझे झुगारून तरुणांनी जागतिक पातळीवरील सिनेमा पाहायला हवा. या सिनेमांमधून संदेश तर मिळतोच मात्र प्रेरणा देखील मिळतात. असे प्रतिपादन चित्रपट पटकथालेखक व सिनेसमीक्षक अमोल उदगीरकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने शनिवार, दि.११ जानेवारी रोजी विद्यापीठात कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमालेत **“सिनेमा कसा पाहावा”** या विषयावर अमोल उदगीरकर यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी वित्त व लेखा अधिकारी डॉ. विवेक काटदरे होते. श्री उदगीरकर म्हणाले की, अलिकडच्या काळात सर्व माध्यमांमध्ये छोट्या शहरांमधून आलेल्या तरुणांचा वावर दिसतो. छोट्या शहरातील माणूस हा डिजीटल माध्यमांमध्ये ताकदीचा आशय घेऊन उभा आहे. त्यामुळे कथानकांचा केंद्रबिंदू छोट्या शहरांकडे सरकला आहे. सद्याचा प्रेक्षक वेगवेगळया चित्रपटांना स्वीकारू लागला आहे. मसाला सिनेमांसोबत जागतिक पातळीवरील हॉलीवूड, कोरिया, जर्मनी, स्पेन, स्पॅनिश, मॅक्सीकन सिनेमे बघण्याची सवय लावायला हवी. हे चित्रपट पाहिल्यानंतर त्यावर व्यक्त व्हा, डोळे उघडे ठेऊन चित्रपट पहा कारण एखादा चित्रपट तयार होतांना तीनशे विभाग काम करत असतात. त्या सर्व विभागांचा कोलाज म्हणजे सिनेमा होय. टीमवर्कचे ते उत्तम उदाहरण होय. सिनमातून मिळालेले ज्ञान कधीही वाया जात नाही. करिअर मध्ये त्याचा फायदा होतो. असे ही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात डॉ.काटदरे यांनी स्थिरता हा भ्रम असून बदल हे सत्य आहे असे सांगूण बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत तरुण पिढीने सिनेमा पाहायला हवा असे आवाहन केले.

प्रारंभी जनसंपर्क अधिकारी, डॉ.सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचलन प्रविण चंदनकर यांनी केले. कर्मवीर व्यंकट रणधीर प्रतिष्ठान, शिरपूर यांनी दिलेल्या देणगीतून ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

---

प्रति,
मा. संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमीस प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी